## शिक्षक भारती संघटना बैठकीचे इतिवृत्त दि. १७/०४/२०१८

| अ.क. | सर्वसाधारण विषय | करावयाच्या कार्यवाहीचा तपशील | कार्यवाही कोणत्या स्तरावर | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | भविष्य निर्वाह निधीच्या पावत्या प्रत्येक वर्षी मे-जून मध्ये देणेत याव्यात. | सन २०१६-१७ च्या भ.नि.नि.पावत्या वितरित करण्याची कार्यवाही सुरु आहे. प्रलंबित असणाऱ्या भविष्य निर्वाह निधीच्या पावत्या सर्व अधीक्षक, वेतन पथक यांनी त्यांच्या स्तरावर सर्व लेखे पूर्ण करुन मुदतीत भ.नि.नि.स्लिपांचे वितरण करण्याची कार्यवाही तात्काळ करणेत यावी. सर्व शिक्षणाधिकारी यांनी वेतन पथकास आवश्यकत्या सूचना देवून माहे जून, २०१८ पर्यंत कामकाज पूर्ण करण्याची दक्षता घ्यावी. | शिक्षणाधिकारी/ वेतन पथक स्तरावर | माहे-जून २०१८ |
| २ | शिक्षकांना अशैक्षणिक कामे देऊ नयेत उदा (BLO) | शासनस्तरावरील धोरणात्मक बाब आहे. | शासनस्तरावर | -- |
| ३ | वरीष्ठ आणि निवड श्रेणी ची संस्था चालक यांच्या ठरावाची अट रद्द करुन ते अधिकार मुख्याध्यापकांना देणेत यावा. | शाळांतील एखादा शिक्षक वरीष्ठ आणि निवड श्रेणी बाबतचे सर्व निकषांची पूर्तता करत असेल आणि संस्था ठराव देत नसेल अथवा शाळा मुख्याध्यापकांकडून जर शिक्षणाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव सादर करणेस टाळाटाळ होत असेल तर शिक्षणाधिकारी यांनी सुनावणी घेवून त्यांचे स्तरावर अशा प्रस्तावांना मान्यता द्यावी. | शिक्षणाधिकारी स्तरावर | -- |
| ४ | सन २००५ नंतर सेवेत आलेल्या सर्व कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करणेत यावी. | धोरणात्मक बाब आहे. | -- | -- |
| ५ | कमी पटसंख्येच्या शाळा बंद करणेत येऊ नयेत. | धोरणात्मक बाब आहे. | -- | -- |
| ६ | खाजगी कंपन्यांना शाळा चालावणेस देऊ नयेत. | धोरणात्मक बाब आहे. | -- | -- |
| ७ | शिक्षक भरतीवरील बंदी उठवावी. | धोरणात्मक बाब आहे. | -- | -- |
| ८ | शिक्षकेतर कर्मचारी भरती बंदी उठवावी. | धोरणात्मक बाब आहे. | -- | -- |
| ९ | २००५ नंतरच्या कर्मचाऱ्यांच्या DCPS कपात | DCPS योजनेमध्ये कर्मचाऱ्याच्या वेतनातून जेवढी रक्कम | शिक्षणाधिकारी/वेतन | -- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | केलेल्या रक्कमेच्या पावत्या प्रत्येक वर्षाअखेरीस मिळाव्यात. | कपात करण्यात आली आहे, तेवढीच १० टक्के समतूल्य रक्कम संबंधितांच्या खात्यावर भरण्यासाठी शासनाकडून आर्थिक तरतूद विभागास दि. १५ मार्च २०१८ रोजी प्राप्त झाली आहे. तसेच व्याजाची रक्कमसुध्दा शासनाकडून प्राप्त झालेली आहे. संचालनायाकडून आदेश प्राप्त होताच ती कर्मचाऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात येईल व हिशोब पत्रिकादेखील वितरित करण्यात येतील.<br>शिक्षणाधिकारी/वेतन पथक यांनी तीन महिन्यात कार्यवाही पूर्ण कारावी. | पथक स्तरावर | |
| १० | दि. २३/१०/२०१७ च्या GR मधील वरिष्ठ वेतन संदर्भातील अट रद्द करावी. | दि. २३/१०/२०१७ च्या GR मधील वरिष्ठ वेतन संदर्भातील अट रद्द करण्यात आली आहे. | -- | -- |
| ११ | सन २०१७-१८ ची संच मान्यता माध्यमिक शाळांना कधी प्राप्त होणार आहे? याबाबत व त्यानंतर होणाऱ्या शिक्षक भरतीबाबतची माहिती प्राप्त व्हावी. | ऑनलाईन संच मान्यतेबाबतची कार्यवाही एनआयसी, पुणे यांचेकडून करणेत येते. वरिष्ठ स्तरावरुन अद्याप याबाबत कोणत्याही सूचना प्राप्त नाहीत. | -- | -- |
| १२ | पदवीधर शिक्षकांच्या सेवाज्येष्ठतेबाबत शासन निर्णय दि. १४.११.२०१७ नुसार कोणत्या स्वरुपातील कार्यवाही आपल्याकडून व शिक्षणाधिकारी स्तरावरुन होत आहे. याची लेखी माहिती मिळावी. | एमईपीएस ॲक्ट मधील सेवाज्येष्ठतेबाबत तरतूदी आणि दि.१४/११/२०१७ च्या शासन निर्णयामधील मार्गदर्शक तत्त्वांमध्ये तफावत आहे. याबाबत शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांनी शासनाकडे शासन निर्णय दुरुस्तीबाबत प्रस्ताव सादर केलेला आहे. शासनाकडून शुध्दीपत्रक येणे अपेक्षित आहे. | शासन स्तरावर | -- |
| १३ | विभागातील जिल्ह्यामध्ये सन २०१६-१७ च्या संच मान्यतेनुसार अतिरिक्त ठरलेले एकूण शिक्षक किती? त्यापैकी किती शिक्षकांना सामावून घेण्यात आले? किती शिक्षक अद्याप सामावून घेणे बाकी आहे? त्याबाबत कार्यालयाने | सांगली, सातारा व रत्नागिरी जिल्ह्यातील समायोजन प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. कोल्हापूर जिल्ह्यात एकूण १२९ अतिरिक्त शिक्षकांपैकी ९६ जणांची समायोजन प्रक्रिया अवलंबली गेली. पैकी ४७ शिक्षक हजर झालेले आहेत. रुजू न करुन घेतलेल्या शाळांची ४९ पदे व्यवगत करण्याची | शिक्षणाधिकारी स्तरावर | -- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | कोणती भूमिका स्विकाली आहे? | करवाई सुरु कण्यात आलेली आहे. या ४९ पदांपैकी ३१ शिक्षकांनी न्यायालयात समायोजनाबाबत याचिका दाखल केलेल्या आहेत.<br>सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये ७ शिक्षकांचे समायोजन बाकी आहे. | | |
| १४ | दि. ०२/०५/२०१२ नंतर पूर्वपरवानगी शिवाय नियुक्त केलेल्या माध्यमिक शिक्षकांना वैयक्तिक मान्यता दिल्या जाणार आहेत का? त्याबाबतची माहिती मिळावी. | दि. ०२.०५.२०१२ पुर्वी ज्या संस्थांनी/शाळांनी भरतीप्रक्रिया चालू केली असेल व त्यांना २०१२ नंतर जर नियुक्ती मिळाली असेल केवळ अशाच पदांना शिक्षणाधिकारी मान्यता देऊ शकतील.<br>दि. ०२.०५.२०१२ नंतर जर शिक्षक मान्यतेबाबत न्यायालयीन आदेश झाले असतील तर सर्व शिक्षणाधिकारी यांनी दि. २३.०८.२०१७ च्या शासन निर्णयान्वये तसेच शासनाच्या दि. ०४.०१.२०१८ रोजीच्या शासन परिपत्रकानुसार कार्यवाही करावी. | शिक्षणाधिकारी स्तरावर | -- |
| १५ | संघटनेच्या सहविचार सेवा नियमित व्हाव्यात. | सर्व शिक्षणाधिकारी यांनी संघटनेच्या त्रैमासिक सहविचार सभांचे आयोजन करावे. | शिक्षणाधिकारी स्तरावर | -- |
| १६ | काही शाळांमध्ये कर्मचाऱ्यांना सेवा पुस्तक दिले जात नाही, वरिष्ठ व निवड श्रेणीचे प्रस्ताव जाणीवपूर्वक पाठविले जात नाहीत. याबाबत शिक्षणाधिकारी व आपल्या स्तरावरुन कारवाई करण्यात यावी. | दि. १ ऑगस्ट च्या वेतनदेयकाबरोबर शाळेतील सर्व कार्यरत कर्मचाऱ्यांची सेवाज्येष्ठता यादी, सेवापुस्तकाची दुय्यम प्रत पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्राची मागणी मुख्याध्यापक यांचेकडून करण्यात यावी. याबाबत शाळेतील सर्व कर्मचाऱ्यांच्या एकत्रित स्वाक्षरीचे प्रमाणपत्र वेतन पथक कार्यालयाने घ्यावे. | शिक्षणाधिकारी वेतनपथक/ शाळा स्तरावर | -- |
| १७ | शिक्षकाचा नियमानुसार कार्यभार किती? याबाबत मार्गदर्शन व्हावे. | महाराष्ट्र विद्याप्राधिकरणाच्या दि. ०५.१०.२०१७ च्या परिपत्रकामाध्ये कार्यभाराबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार कार्यवाही करावी. | शाळा स्तरावर | -- |
| १८ | डी.एड.वेतन श्रेणीतील व पदवीधर शिक्षकांचे वरिष्ठ वेतन श्रेणीचे प्रशिक्षण लवकरात लवकर घेण्यात यावे. ते होणार नसेल तर हमीपत्राव | दि. ०२ मे २०१८ पासून वरिष्ठ/निवडश्रेणी बाबतचे प्रशिक्षण राज्यमंडळाकडून घेण्यात येणार आहे. सदर प्रशिक्षणास ऑनलाईन नावे नोंदणी करावयाची आहेत. | शिक्षणाधिकारी/ संघटना स्तरावर | -- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | प्रस्ताव मंजू करण्यात यावेत. | ऑनलाईन नावे नोंदणीसाठी शिक्षकांकडून मिळणाऱ्या अल्प प्रतिसादामुळे राज्यमंडळास प्रशिक्षण पुढे ढकलावे लागते त्यामुळे आपल्या संघटनेकडून जास्तीत जास्त पात्र लाभार्थ्यांना प्रशिक्षणासाठी राज्यमंडळाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन नावे नोंदणी करण्याबाबत सूचना देण्यात याव्यात.<br>तसेच शिक्षणाधिकारी यांनी वरिष्ठ/निवडश्रेणीस पात्र असणाऱ्या व प्रशिक्षण पूर्ण न केलेल्या शिक्षकांकडून लगतचे प्रशिक्षण पूर्ण करण्याच्या अटीवर हमीपत्र घेवून सुनावणी घेवून वरिष्ठ/निवडश्रेणीस मान्यता द्यावी. | | |
| १९ | काही शाळांची संचमान्यतेमध्ये दुरुस्ती करणे राहून गेले आहे. अशा शाळांच्या संचमान्यतेमध्ये दुरुस्ती करुन मिळावी म्हणजे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसार होणार नाही. | याबाबत शिक्षण उपसंचालक कार्यालयात विभागातील सर्व उपशिक्षणाधिकारी यांचे कॅम्प आयोजित करुन दुरुस्त्या करण्यात आलेल्या आहेत. | -- | -- |

शिक्षण उपसंचालक
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर